SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
**Stat Cell** : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०२५-२६/ 149 दिनांक : 29/10/2025

# परिपत्रक

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**
(Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांसाठी)

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS)**
सन २०२५-२६ या वर्षाची माहिती Excel Format मध्ये पाठविण्याबाबत...

**संदर्भ : मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट राज्य, पुणे यांचे क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२५-२६/E-२३३३०६४, दि.२८/१०/२०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालयाकडून **सन २०२५-२६** हया वर्षाच्या माहिती नोंदणीसाठी **Excel Format उपलब्ध करून देण्यात आली आहे.** या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित तसेच Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२५-२६ करिता माहिती Excel Format मध्ये नोंद करुन संचालनालयास पाठविण्यात यावी.

सदर माहिती Excel Format मध्ये नोंद करुन संचालनालयास **पाठविण्याचे काम दि.१०/११/२०२५ पर्यत संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निशिचतपणे पुर्ण करावयाचे आहे.** सदर माहिती नोंदणीचे Excel Format ई-मेल सोबत जोडत आहोत. सदर विवरणपत्राप्रमाणे आपल्या महाविद्यालयाकडून माहिती Excel Format मध्ये नोंद करावी. माहिती नोंद केलेले Excel Format मा. शिक्षण संचालनालय, पुणे कार्यालयाच्या dhemisdata6@gmail.com व सांख्यिकी कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या statcell@unishivaji.ac.in या ई-मेल आयडी वरती पाठविण्यात यावी. सदर माहिती Excel स्वरुपात पाठविताना AISHE Code ने Excel चे नाव देण्यात यावे. उदा. AISHE Code C-१२३४५ असल्यास Excel C-१२३४५.xls असे असेल.

महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडून त्वरीत कार्यवाही करून घ्यावी ही विनंती.

**एमआयएस साठी Excel Format मध्ये माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**